# सातारा जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

## " आपले आरोग्य आपल्या हाती "

### -: संकल्पना :-

**"आपले आरोग्य आपल्या हाती"** ही संकल्पना सातारा जिल्हयाच्या आम जनतेसाठी उपलब्ध करुन घेण्याचा मुख्य उद्देश हा आहे की, आपले बरेचसे आजार आपण केलेल्या चुकीच्या आहार विहारामुळेच होत आहेत. जर आम जनता या चुकाबाबत जागरुक राहिली व अशा प्रकारचा चुकीचा आहार टाळण्याचा प्रयत्न केला तर बरेचसे आजार औषधोपचार न घेता व कोणत्याही वैद्यकिय सल्ल्याविना बरे होऊ शकतात. या संकल्पनेने आपले आरोग्य आपल्या हाती हा उपक्रम राबविणेचा मानस जिल्हा परिषद साताराच्या माध्यमातुन करण्याचा उद्देश आहे.

या संकल्पनेअंतर्गत सर्वप्रथम आहार विहार याबाबत जागरुकता स्वच्छ पाणी, सुर्यप्रकाश, हवा, व माती यापासुन आरोग्याला सुस्थितीत कसे ठेवता येईल याबाबतचे प्रशिक्षण व व्यायाम, योगा, प्राणायाम आणि मनातील विचार या माध्यमातुन आरोग्य राखण्यासाठी ज्या काही उपाययोजना करता येतील त्याची चर्चा केली जाणार आहे. यासाठी सर्वप्रथम लोकांमध्ये व महिलांमध्ये जागरुकता आणण्यासाठी व्हीडीओच्या माध्यमातुन लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत जर काही इच्छुक व्यक्ती सदरहु संकल्पना पूर्ण शिकण्यासाठी इच्छा दर्शवित असतील तर त्यांचे विस्तृत प्रशिक्षण घेतले जाईल. चांगल्या प्रकारे मार्गदर्शक तयार झाल्यास त्यांच्या मार्फत लोकांपर्यंत हे विषय घेऊन जाणेसाठी कार्य केले जाईल. सातारा जिल्हा परिषदेमार्फत ही योजना दि. 15/8/2015 पासुन राबविणेत आली आहे व त्यादृष्टीने काही तालुक्यातुन

अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस यांच्या कार्यशाळेमधुन व्हीडीओद्वारा माहिती पोहोचविणेस सुरुवात करणेत आलेली आहे.

या मोहिमेअंतर्गत प्रामुख्याने अंगणवाडी, आशा, शाळेतील शिक्षक, आरोग्य कर्मचारी, महिला बचत गट सदस्य, या क्षेत्रात काम करणा-या स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत सदरहु संकल्पना लोकांमध्ये रुजु करण्याचा मानस आहे.

संपूर्ण संकल्पना राबविण्यासाठी स्वयंसेवेने अथवा स्वयंप्रेरीत व्यक्तीमार्फतच कार्य करण्याचे ठरविले आहे. सातारा जिल्हयातील नागरीकांनी याबाबत आपला सक्रीय सहभाग दर्शवावा अशी विनंती या माध्यमातुन करण्यात येत आहे.

**"आपले आरोग्य आपल्या हाती"** या संकल्पनेबाबत अधिक माहितीसाठी संपर्क साधावयाचा असेल तर सातारा जिल्हा परिषद येथील माहिती व तंत्रज्ञान कक्षातील (I. T. CELL) श्री. श्रीकांत ताडे, दुरध्वनी क्र. 02162-238043 अथवा मोबाईल नं. 9422404267 यांचेशी संपर्क साधावा.

...........पुढील पानावर